निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
मंगळवार
२४ मार्च २०२६
पाने: ०४ किंमत: २.००
वर्ष: १६ वे अंक: १८ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## सहकार महर्षी दत्ताजी मेघे अनंतात विलीन; पवनारच्या भूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार!

**आत्ताच एक्सप्रेस**

**वर्धा / प्रतिनिधी**/ विदर्भाच्या राजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व, शिक्षण प्रसारक आणि माजी खासदार दत्ताजी मेघे यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. आज त्यांच्या जन्मगावी, पवनार येथे हजारो साश्रू नयनांच्या उपस्थितीत आणि पूर्ण शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह महाराष्ट्राच्या राजकीय पटलावरील दिग्गज नेत्यांनी यावेळी उपस्थित राहून या जननायकाला अखेरची मानवंदना दिली.

### एक पर्वाचा अंत

**दत्ताजी मेघे यांचे पुत्र आमदार समीर मेघे आणि सागर मेघे यांनी अंत्यसंस्काराचे विधी पार पाडले. पवनारच्या धाम नदीच्या परिसरात 'दत्ताजी मेघे अमर रहे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. शैक्षणिक संस्थांचे जाळे विणणारा आणि गरीबांच्या आरोग्यासाठी रुग्णालय उभी करणारा एक 'आधारस्तंभ' आज काळाच्या पडद्याआड गेला आहे.**

मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्र्यांकडून पुष्पचक्र अर्पण

दत्ताजी मेघे यांच्या निधनाची बातमी समजताच संपूर्ण विदर्भावर शोककळा पसरली होती. काल नागपूर येथे त्यांचे निधन झाले, त्यानंतर आज त्यांचे पार्थिव पवनार येथे आणण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केले. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही उपस्थिती होती. या दोन दिग्गज नेत्यांनी मेघे कुटुंबाचे सांत्वन केले आणि दत्ताजींच्या कार्याचा गौरव केला.

मान्यवरांची मांदियाळी: राजकीय क्षेत्राची मोठी हानी

दत्ताजी मेघे यांनी आपल्या आयुष्यात केवळ राजकारण केले नाही, तर हजारो कार्यकर्ते आणि अनेक आमदार-खासदार घडवले. त्यांच्या अंत्यविधीला उपस्थित असलेल्या नेत्यांची यादी त्यांच्या व्यापक जनसंपर्काची साक्ष देत होती.

**मंत्री:** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, **प्रतिनिधी:** खासदार अमर काळे, आमदार अभिजित वंजारी, समीर कुणावार, राजेश बकाने, चरण ठाकूर.

**माजी नेते:** रणजित देशमुख, हंसराज अहीर, राजेंद्र मुळक, रामदास तडस, सुरेश वाघमारे, **प्रशासन:** जिल्हाधिकारी वान्मथी सी, पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अन्य वरिष्ठ अधिकारी.

पोलीस दलाची मानवंदना

दत्ताजी मेघे यांनी राज्य मंत्रिमंडळात भूषवलेली पदे आणि त्यांचे सामाजिक



योगदान लक्षात घेता, राज्य शासनाने त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला होता. महाराष्ट्र पोलीस दलाच्या तुकडीने हवेतील फैरी झाडून आणि शोकधून वाजवून या महान नेत्याला मानवंदना दिली.

दत्ताजींनी प्रत्यक्ष कृतीतून समाजकारण कसे असावे याचा वस्तूपाठ घालून दिला. त्यांनी माझ्यासारखे अनेक लोकप्रतिनिधी घडवले. त्यांच्या जाण्याने वर्धा जिल्ह्याचे आणि संपूर्ण राज्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे.

**- डॉ. पंकज भोयर,**
**पालकमंत्री, वर्धा.**

## संक्षिप्त

### टीबीमुक्त भारतासाठी १०० दिवसांची विशेष मोहीम; राज्यात व्यापक अंमलबजावणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी**/भारत सरकारतर्फे जागतिक क्षयरोग दिन २०२६ निमित्त टीबी मुक्त भारत अभियान - १०० दिवसांची विशेष मोहीम २४ मार्चपासून देशभरात राबविण्यात येणार असून, महाराष्ट्रातही या मोहिमेची व्यापक अंमलबजावणी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने ही मोहीम राज्यातील सर्व जिल्हे व शहरी भागांमध्ये राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत एआय आधारित व्हलनरेबिलिटी मॅपिंगद्वारे निवडण्यात आलेल्या ११,०९१ जोखीमग्रस्त गावे व शहरी वॉर्डमध्ये विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. पारंपरिक लक्षणांवर आधारित तपासणीऐवजी जोखीमग्रस्त लोकसंख्येची सक्रीय तपासणी करण्यावर भर देण्यात येणार आहे. नि-क्षय पोर्टलवरील एआय विश्लेषणाच्या आधारे सूक्ष्म नियोजन व रूट मॅपिंग करण्यात आले असून, वृद्ध, मधुमेही, कुपोषित, पीएलएचआयव्ही, क्षयरुग्णांचे संपर्क, स्थलांतरित व झोपडपट्टीतील नागरिकांची १००% तपासणी सुनिश्चित केली जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हाताने वापरता येणारे क्ष-किरण यंत्रणांद्वारे जलद तपासणी करून संशयित रुग्णांना तत्काळ एनएएटी चाचणीसाठी पाठविण्यात येणार आहे. दुर्गम व आदिवासी भागांमध्ये नि-क्षय मोबाईल युनिटद्वारे सेवा पोहोचविण्यात येतील.

या मोहिमेत आयुष्मान आरोग्य शिबिरांद्वारे क्षयरोगासोबतच मधुमेह, उच्च रक्तदाब, ॲनिमिया व कुपोषण यांसारख्या आजारांची एकत्रित तपासणी करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर विविध विभागांचा समन्वय साधत रुग्णांना सेवा दिली जाणार आहे. लोकप्रतिनिधी, स्वयं सहाय्यता गट, माय भारत स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्था व शैक्षणिक संस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यात येणार असून, नि-क्षय मित्र उपक्रमाद्वारे रुग्णांना पोषण व मानसिक आधार दिला जाणार आहे.या १०० दिवसांच्या कालावधीत प्रत्येक उच्च-जोखीम क्षेत्रात आयुष्मान आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार असून, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर अभियानाचा शुभारंभ करण्यात आला आहे. दिवसनिहाय व गावनिहाय सूक्ष्म नियोजन तयार करण्यात आले आहे. संपूर्ण मोहिमेचे रिअल-टाइम संनियंत्रण नि-क्षय पोर्टलद्वारे करण्यात येणार असून, जिल्हा व राज्य स्तरावर नियमित आढावा घेतला जाणार आहे. या मोहिमेमुळे क्षयरुग्णांचा लवकर शोध, वेळेत उपचार, उपचारातील सातत्य आणि मृत्यूदरात घट साध्य होण्यास मदत होणार आहे. राज्यात क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने ही मोहीम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचा विश्वास आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे.

## रेल्वे सुरक्षा दलाची सतर्कता: वाशीममध्ये ५ अल्पवयीन मुलांची सुटका

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड/प्रतिनिधी**/दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दलाने आपल्या कर्तव्यदक्षतेचा आणि माणुसकीचा पुन्हा एकदा प्रत्यय दिला आहे. 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते', 'ऑपरेशन अमानत' आणि 'ऑपरेशन यात्री सुरक्षा' या मोहिमांअंतर्गत आरपीएफने वाशीम, नांदेड, जालना आणि पूर्णा यांसारख्या विविध स्थानकांवर यशस्वी कारवाया करून प्रवासी सुरक्षा आणि सार्वजनिक सेवेचा आदर्श निर्माण केला आहे.

वाशीम रेल्वे स्थानकावर आरपीएफच्या सतर्कतेमुळे पाच अल्पवयीन मुलांचे प्राण वाचले आणि त्यांना सुरक्षित आधार मिळाला. आरपीएफचे हेड कॉन्स्टेबल एस. एम. बालखंडे यांना रेल्वे परिसरात फिरताना पाच मुले अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत आढळली. चौकशीअंती ही मुले घरातून पळून आल्याचे समोर आले.

बालखंडे यांनी तात्काळ चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) ला पाचारण केले. जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या मदतीने मुलांचे समुपदेशन करण्यात आले आणि त्यांच्या पालकांशी संपर्क साधण्यात आला. सध्या ही मुले पुढील संगोपनासाठी चाईल्ड हेल्पलाईनच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. प्रवासात गडबडीत सुटलेले सामान सुरक्षितपणे मालकांपर्यंत पोहोचवण्याचे काम आरपीएफ प्रामाणिकपणे करत आहे.

नांदेड स्थानक: गाडी क्रमांक ११००१ एक्सप्रेसमध्ये एका प्रवाशाचे ८,००० किमतीचे टायटन कंपनीचे स्टीलचे घड्याळ विसरले होते. हेड कॉन्स्टेबल एस. श्रीधर यांनी हे घड्याळ शोधून काढले आणि योग्य पडताळणीनंतर प्रवाशाला परत केले. जालना स्थानक: कॉन्स्टेबल संदीप जाधव यांना एक बेवारस बॅग आढळली, ज्यामध्ये सॅमसंग मोबाईल आणि महत्त्वाची औषधे होती. ती बॅग शोधून मूळ प्रवाशाला सुपूर्द करण्यात आली.

प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देत आरपीएफ आणि लोहमार्ग पोलीस (ऋछझ) यांच्या संयुक्त पथकाने पूर्णा जंक्शन येथे मोठी कारवाई केली. चोरीच्या उद्देशाने वावरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पथकाने शिताफीने अटक केली. प्रवाशांसाठी सुरक्षित आणि मित्रत्वाचे वातावरण निर्माण करण्यासाठी रेल्वे सुरक्षा दल सदैव कटिबद्ध आहे.

## जालना शहरात वायू गुणवत्ता निर्देशांक मोजणी यंत्र बसवण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ता- राहुल सत्यनारायण करनाडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ जागतिक हवामान दिनानिमित्त जालना शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर वायू गुणवत्ता निर्देशांक (-ळी टींरश्रळीं वायु प्रदूषण मोजण्यासाठी यंत्रे बसवण्याची मागणी जोर धरत आहे.सामाजिक कार्यकर्ता राहुल सत्यनारायणजी करनाडे यांच्या नेतृत्वाखाली सुमारे ५० नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनात जालना चखऊ परिसरातील उद्योग तसेच शहरातील वाढती वाहतूक यामुळे वायू प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होत असून श्वसनाचे आजार व इतर समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे नमूद करण्यात आले.

देशातील दिल्ली,मुंबई,पुणे यांसारख्या शहरांमध्ये वायू गुणवत्ता निर्देशांक मोजणी यंत्रे बसवून नागरिकांना तत्काळ माहिती दिली जाते. मात्र जालना शहरात अशी सुविधा अपुरी असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

निवेदनामध्ये जालना एम आय.डी. सी परिसर तसेच शहरातील प्रमुख ठिकाणी वायू गुणवत्ता मोजणी यंत्रे बसवणे,प्रदूषण नियंत्रणासाठी कडक कारवाई करणे व नागरिकांना माहिती उपलब्ध करून देणे या मागण्या करण्यात आल्या आहेत. तसेच,जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संबंधित सर्व विभागांना पत्रव्यवहार करून तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.जर लवकरात लवकर कार्यवाही झाली नाही तर नागरिक लोकशाही मार्गाने आंदोलन केल्या जाईल,असा इशाराही देण्यात आला.

याप्रसंगी राहुल सत्यनारायणजी करनाडे,अशोक चांदोडे, धरम गरंडवाल,सय्यद स्माईल,शेख फेरोज,शेख सिद्धिक,उमेशसिंह राजपूत,अर्जुनसिंह राजपूत, अमोल भक्कड,दिपक डोंगरे,भारत भगुरे,विनोद बिरसोने,अनिल सूर्यनारायण,विजय भगत, भरताना भक्त,सुभाष पिंपळे,संजय इमले,अशोक पिंपळे,सुनील कटारिया,कैलास पाटील पृथ्वीराजसिंग राजपूत,संजय चोपडे आदी यावेळी उपस्थित होते.




## रेड्याच्या टकरीवरून झालेल्या वादाचा शेवट रक्ताने; आरोपींना बेड्या ठोकल्या!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी**/ किरकोळ वादाचे रूपांतर भीषण हत्येत झाल्याची धक्कादायक घटना जालना शहरात घडली आहे.

रेड्यांच्या टकरीवरून सुरू झालेल्या वादातून एका तरुणाचा निर्घृण खून करण्यात आला असून, कदीम जालना पोलिसांनी पळून जाणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळून त्यांना जेरबंद केले आहे. दिनांक २२ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ७:३० च्या सुमारास फिर्यादी प्रेम अशोक लाड यांचा आरोपी सोमनाथ लाड, त्याचा भाऊ रवींद्र लाड आणि भाचा नरेश अवघड यांच्याशी 'रेड्यांची टकर' लावण्यावरून किरकोळ वाद झाला होता. हा वाद मिटवण्याच्या बहाण्याने आरोपींनी फिर्यादी प्रेम लाड आणि त्यांचा भाऊ रवींद्र (रवी) लाड यांना मोतीबाग ईदगाह परिसरात बोलावले.



**बहाणा मिटवण्याचा, कट रक्ताचा!**

दोन्ही भाऊ तिथे पोहोचताच, आरोपींनी आधीच ठरवल्याप्रमाणे तलवारी, चाकू आणि लोखंडी रॉडने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला चढवला. या रक्तरंजित हल्ल्यात रवींद्र लाड याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्याला तातडीने जालना येथील सरकारी रुग्णालयात आणि त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले. मात्र, मृत्यूशी झुंज देताना आज सकाळी रवींद्र लाड याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

जालना हादरले!

पोलिसांची 'सिंघम' स्टाईल कारवाई

घटनेचे गांभीर्य ओळखून कदीम जालना पोलिसांनी तातडीने पावले उचलली. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते, मात्र पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तीन विशेष पथके तयार केली.

**अटक केलेले आरोपी:**

संतोष श्रीचंद लाड (रा. इंदिरानगर, गवळी मोहल्ला), सुरज दादाराव सतकर (रा. इंदिरानगर, गवळी मोहल्ला), सोमनाथ अशोक लाड (रा. संजयनगर) या तिघांनाही आज सकाळी ९:३० वाजता काजळा गावच्या शिवारातून पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. त्यांच्यावर खुनाचा (कलम १०३(१)) गुन्हा दाखल करण्यात आला असून अटकेची कारवाई सुरू आहे.

ही धडाकेबाज कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे व त्यांच्या पथकाने फत्ते केली.

# वणवे रोखा, निसर्गसंपदा वाचवा: काळाची गरज

उन्हाळ्याची चाहूल लागली की निसर्ग सुकू लागतो, पण दुर्दैवाने याच काळात आपल्याकडील वनसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडते. दरवर्षी वर्तमानपत्रांत अमक्या जंगलाला आग, तमुक टेकडीवर वणवा अशा बातम्या आपण वाचतो. पण ही केवळ बातमी नसून ती आपल्या वसुंधरेच्या ऱ्हासाची किंकाळी आहे.

**१. वणवा म्हणजे काय आणि तो का पसरतो?**

जंगलात लागलेली आग जेव्हा अनियंत्रित होते आणि वाऱ्याच्या वेगाने पसरते, तेव्हा त्याला वणवा म्हणतात.

**इंधन:** वाळलेला पालापाचोळा, गवत आणि लाकूड हे आगीसाठी उत्तम इंधन ठरते.

नैसर्गिक कारणे: क्वचित प्रसंगी बांबूंचे घर्षण किंवा वीज पडल्याने आग लागते.

मानवनिर्मित कारणे: ९०% पेक्षा जास्त वणवे हे मानवी हस्तक्षेपामुळे लागतात. शिकारीसाठी रस्ता साफ करणे, गुरांना नवीन गवत येईल या आशेने जाणीवपूर्वक आग लावणे किंवा पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे (सिगारेटचे थोटूक, कॅम्पफायर) आगी लागतात.

**२. निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी**

वणव्यामुळे केवळ झाडे जळत नाहीत, तर संपूर्ण परिसंस्था (Ecosystem) नष्ट होते:

जैवविविधतेचा ऱ्हास: गोव्यातील महादयी अभयारण्य किंवा पुण्यातील टेकड्यांवरील आगीत दुर्मिळ औषधी वनस्पती, वेली आणि लहान जीव जळून खाक होतात.

वन्यजीवांचे स्थलांतर व मृत्यू: पक्ष्यांची घरटी, सरपटणारे प्राणी आणि जमिनीवर राहणारे सस्तन प्राणी या आगीतून वाचू शकत नाहीत.

तापमान वाढ: आगीमुळे उत्सर्जित होणारा कार्बन डायऑक्साइड जागतिक तापमान वाढीस (ऋश्रेलरश्र थरीाळपस) कारणीभूत ठरतो.

**३. 'वृक्षारोपण' विरुद्ध 'वणवा': एक विसंगती**

शासन आणि स्वयंसेवी संस्था पावसाळ्यात कोट्यवधी रुपये खर्च करून वृक्षारोपण करतात. लोक हिरीरीने रोपे लावतात, त्यांना पाणी घालतात. मात्र, उन्हाळ्यातील एका वणव्याचा लोट या वर्षांनुवर्षांच्या मेहनतीवर काही तासांत पाणी फेरतो. ही केवळ पर्यावरणाचीच नाही, तर राष्ट्राची आर्थिक हानी देखील आहे.

**४. प्रशासकीय उदासीनता आणि आव्हाने**

डोंगराळ भागातील जटिल भूरचनेमुळे अग्निशमन दलाला तिथे पोहोचणे कठीण जाते. मात्र, अनेकदा वन खाते आणि पोलीस प्रशासनाचे या समाजकंटकांकडे होणारे दुर्लक्ष ही मोठी समस्या आहे. जाणीवपूर्वक आग लावणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होत नसल्याने गुन्हेगारांचे धाडस वाढत आहे.

**५. उपाययोजना: आपण काय करू शकतो?**

Fire Lines (अग्निरोधक पट्टे): वन विभागाने उन्हाळ्यापूर्वीच जंगलात ठराविक अंतरावर पट्टे साफ करणे आवश्यक आहे जेणेकरून आग पुढे पसरणार नाही.

**कठोर कायदे:** वणवा लावणे हा अजामीनपात्र गुन्हा मानून संबंधितांवर कडक कारवाई व्हायला हवी.

**जनजागृती:** डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या ग्रामस्थांना वणव्याचे तोटे समजावून सांगणे. चांगले गवत येईल हा त्यांचा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.

**आधुनिक तंत्रज्ञान:** ड्रोन किंवा सॅटेलाइट अलर्ट सिस्टमचा वापर करून आग लागल्याची माहिती तात्काळ मिळवणे.

**निष्कर्ष:**/ निसर्ग ही आपली मालमत्ता नसून आपल्या पुढील पिढीचे देणे आहे. वणवा रोखणे हे केवळ वन विभागाचे काम नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. उन्हाळ्यात डोंगर पेटण्यापूर्वी आपली संवेदनशीलता जागी होणे गरजेचे आहे.

# शब्बीर अहमद अन्सारी: वंचितांच्या हक्कांचा बुलंद आवाज (स्मरणलेख)

भारतीय समाजातील उपेक्षित आणि मागासवर्गीय घटकांना, विशेषतः मुस्लिम समाजातील ओबीसी वर्गाला न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी साहेब यांचे आज, २२ मार्च २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ मुस्लिम समाजच नव्हे, तर संपूर्ण देशातील ओबीसी चळवळीची मोठी हानी झाली आहे.

**जिद्द आणि संघर्षातून घडलेले नेतृत्व**

शब्बीर अहमद अन्सारी यांचा जन्म नोव्हेंबर १९४८ मध्ये परभणी जिल्ह्यातील पाथरी येथे झाला. कौटुंबिक गरिबीमुळे त्यांचे बालपण संघर्षात गेले. त्यांचे कुटुंब नंतर जालन्यातील साळी गल्ली (कदिम जालना) येथे स्थायिक झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण जालन्यात तर माध्यमिक शिक्षण औरंगाबादच्या चेलिपुरा हायस्कूलमध्ये पूर्ण केले. गणितात १०० पैकी १०० गुण मिळवणारे शब्बीर अन्सारी प्रचंड हुशार होते, मात्र आर्थिक ओढाताणीमुळे त्यांना विज्ञानाचे उच्च शिक्षण घेता आले नाही.

त्यांनी जालन्यात एक कुशल शिंपी म्हणून नाव कमावले, पण त्यांचे मन समाजकार्यात होते. पुढे मुंबईला स्थलांतरित झाल्यावर त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ता खऱ्या अर्थाने जागा झाला.

**चळवळीचा उगम: 'महाराष्ट्र राज्य ओबीसी' ते राष्ट्रीय व्यासपीठ**

१९८० च्या दशकात महाराष्ट्रात ओबीसी चळवळ आकार घेत होती. वकील जनार्दन पाटील आणि पत्रकार कपिल पाटील यांच्या सोबतीने त्यांनी १९८१ मध्ये 'महाराष्ट्र राज्य ओबीसी' संघटनेची पायाभरणी केली. मुस्लिम समाजातील ७० पेक्षा जास्त जाती या मागास आहेत, हे त्यांनी पुराव्यासह सरकारसमोर मांडले.

राजकीय प्रभाव: बाबूराव काळे, शंकरराव चव्हाण आणि सिनेमॅटिक दिग्गज दिलीप कुमार यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वांच्या साथीने त्यांनी सरकार दरबारी मुस्लिम ओबीसींचे प्रश्न मांडले.

व्याप्ती: महाराष्ट्रातून सुरू झालेली ही संघटना पुढे 'अखिल भारतीय मुस्लिम ओबीसी संघटना' म्हणून विस्तारली आणि पाहता पाहता ती राष्ट्रीय स्तरावर वंचितांची ताकद बनली.

**मंडळ आयोगाचे शिलेदार**


शब्बीर अन्सारी साहेबांचे नाव घेतल्याशिवाय 'मंडल आयोगाचा' इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. मुस्लिम समाजातील ओबीसी घटकांना आरक्षणाचे फायदे मिळावेत यासाठी त्यांनी रक्ताचे पाणी केले. त्यांच्या या कार्याचा गौरव दिलीप वाघमारे यांनी लिहिलेल्या 'मंडळनामा' या चरित्रातून केला आहे, ज्याचा उर्दू अनुवाद मलिक अकबर यांनी केला.

**एक संवेदनशील व्यक्तिमत्व**

शब्बीर साहेबांशी जालना येथील त्यांच्या निवासस्थानी झालेल्या गप्पांमध्ये नेहमीच समाजाची तळमळ दिसायची. ते केवळ राजकीय नेते नव्हते, तर ते एक द्रष्टे समाजसुधारक होते. शिक्षण, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण हे त्यांचे तीन मुख्य आधारस्तंभ होते.

**निष्कर्ष**

शब्बीर अहमद अन्सारी साहेब आज आपल्यात नाहीत, परंतु त्यांनी उभी केलेली संघटना आणि दिलेला विचारांचा वारसा लाखो लोकांसाठी मार्गदर्शक ठरेल. त्यांनी दाखवलेला संघर्षाचा रस्ता कधीही पुसला जाणार नाही. भारतातील मागासलेले वर्ग त्यांना कायम कृतज्ञतेने स्मरणात ठेवतील.



अल्लाह त्यांना जन्नत-उल-फिरदौसमध्ये उच्च स्थान देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. आमीन.

**लेखक: लियाकत अली खान यासिर जालनवी..**

# भक्तीच्या धामाला गुन्हेगारीचा विळखा; गल्लेबोरगावच्या श्रीराम मंदिरात चोरी..

**खुलताबाद प्रतिनिधी** /खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथे एका धक्कादायक घटनेत अज्ञात चोरट्यांनी ऐतिहासिक श्रीराम मंदिराला लक्ष्य केले आहे. मंदिरातील दानपेटीसह मौल्यवान पादुका लंपास केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली असून, वाढत्या अवैध धंद्यांचा हा परिणाम असल्याची चर्चा आता ग्रामस्थांमध्ये जोर धरत आहे.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी मंदिराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. गाभाऱ्यातील देवाच्या चरणांवरील चांदीच्या पादुका आणि भक्तांनी अर्पण केलेल्या दानाने भरलेली दानपेटी चोरट्यांनी पळवून नेली. सकाळी नित्यनियमाने मंदिर उघडले असता हा प्रकार उघडकीस आला. या चोरीमुळे केवळ आर्थिक नुकसान झाले नसून भाविकांच्या श्रद्धास्थानाला धक्का पोहोचला आहे.

अवैध धंद्यांवरून ग्रामस्थांचा संताप या घटनेनंतर परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी बोलताना अनेक ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला की, परिसरात गेल्या काही काळापासून मोठ्या प्रमाणात अवैध धंदे फोफावले आहेत.

गावात आणि परिसरात वाढलेली अवैध दारू विक्री, जुगार आणि छुप्या मार्गाने चालणारे गैरप्रकार यामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढले आहे. पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच आज देवाचे मंदिरही सुरक्षित राहिलेले नाही, अशी उद्विग्न भावना एका स्थानिक नागरिकाने व्यक्त केली.

पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश पाटील. बीट जमादार मनोहर पुंगळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे. परिसरात सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू असून संशयितांची धरपकड करण्याच्या हालचाली सुरू आहेत. मात्र, केवळ चोर पकडून थांबण्यापेक्षा, या चोरीला खतपाणी घालणाऱ्या अवैध धंद्यांचा कायमचा बंदोबस्त करावा, अशी मागणी गल्लेबोरगावच्या नागरिकांनी केली आहे..

शांतता आणि भक्तीचा वारसा लाभलेल्या गल्लेबोरगाव परिसरात सध्या गुन्हेगारांनी उच्छाद मांडला असून, आता तर चक्क देवाचे मंदिरही सुरक्षित राहिलेले नाही. येथील श्रीराम मंदिरातील दानपेटी आणि पवित्र पादुकांवर चोरट्यांनी डल्ला मारल्याची घटना केवळ चोरी नसून, ती स्थानिक पोलीस प्रशासनाच्या नाकर्तेपणावर ओढलेले ताशेरे आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांना पोलिसांचे मूक पाठबळ लाभत असल्यामुळेच चोरट्यांचे धाडस वाढले असल्याची संतप्त भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

या घटनांची सविस्तर माहिती अशी आहे की सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी संधी साधून गल्लेबोरगाव येथील श्रीराम मंदिराचे कुलूप तोडले. मंदिरात प्रवेश करून ६० ते ७० हजार रुपयांची रोकड असलेली दानपेटी आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पादुका लंपास केल्या. सकाळी पुजाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास येताच गावात एकच खळबळ उडाली.

भुरट्या चोरांना कोणाचे अभय?

गल्लेबोरगाव आणि परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून जुगार, अवैध दारू विक्री आणि इतर काळी कृत्ये उघडपणे सुरू आहेत. स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने हे धंदे फोफावत असल्याचा आरोप गावकरी उघडपणे करत आहेत. जेव्हा अवैध धंद्यांना संरक्षण मिळते, तेव्हा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचे मनोबल वाढते.याच गुन्हेगारीतून आता भुरटे चोर देवाच्या मालमत्तेवर डल्ला मारण्यापर्यंत मजल मारत आहेत.

भाविकांचा संताप आणि पोलिसांपुढे आव्हान

घटनेनंतर पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील. हो बीट जमादार मनोहर पुंगळे यांनी घटनास्थळी भेट दिली असली, तरी केवळ 'पंचनामा' करून पोलीस आपली जबाबदारी झटकणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मंदिरातील चोरीमुळे भाविकांच्या भावना दुखावल्या असून, जोपर्यंत गावातील अवैध धंदे पूर्णपणे बंद होत नाहीत आणि या चोरीचा छडा लागत नाही, तोपर्यंत संताप शांत होणार नाही.

पोलीस प्रशासनाने हफ्तेखोरी बंद करून जर गस्त वाढवली असती, तर आज प्रभू श्रीरामाच्या चरणाशी असलेली मालमत्ता चोरीला गेली नसती. ही चोरी केवळ पैशांची नसून गावाच्या सुरक्षिततेची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. असे संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थ चर्चा करताना दिसत होते.

# बीएलओंच्या नियुक्तीत आर्थिक व्यवहाराचा आरोप गंगापूर तहसील प्रशासनावर प्रश्नचिन्ह; प्रशिक्षित बाजूला, नवखे पुढे

**आत्ताच एक्सप्रेस गंगापूर प्रतिनिधी/ सुभान शहा** / गंगापूर तहसील प्रशासनाकडून बीएलओ (मतदान केंद्रस्तरीय अधिकारी) नियुक्ती प्रक्रियेत आर्थिक व्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, अचानक नवीन बीएलओंना काम देण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. बीएलओंना प्रशिक्षण नसल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचेही समोर आले आहे. नवीन बीएलओंना काहीच माहिती नाही, मग ते काम कसं करणार आणि आमच्या समस्या कोण सोडवणार? अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त ऐनवेळी आदेश केले रद्द तहसिलदार नवनाथ वगवाड यांच्या मार्गदर्शनाखाली



सूत्रांच्या माहितीनुसार, काही व्यक्तींना पैसे घेऊन बीएलओ पदावर नियुक्ती दिली जात असल्याची चर्चा असून, त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अनेक ठिकाणी बीएलओ प्रत्यक्ष कामावर उपस्थित नसून घरी बसूनच काम करत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. बीएलओ फोन उचलत नाहीत, मग आमच्या अडचणी कोणाकडे मांडायच्या? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. तसेच, नवीन नियुक्त सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमादरम्यान काही विद्यमान बीएलओंचे आदेश ऐनवेळी रद्द करण्यात आल्याची माहिती आहे. प्रशिक्षित बीएलओंना बाजूला ठेवून नवीन व्यक्तींना काम देण्यात आल्यामुळे या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडून काय कारवाई केली जाणार आणि मतदारांना दिलासा कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# क्षयरोग मुक्त भारत देश करूया.....

भारत सरकारने सन २०२५ पर्यंत क्षयमुक्त भारत देश करण्यासाठी सर्वच क्षेत्रामध्ये महत्वाची पावले उचलली आहे. याकरीता आपणांस प्रत्येक क्षयरुग्णांपर्यंत पोहोचलो तरच आपण क्षयरोग मुक्त भारत देश करु शकतो. जालना जिल्ह्यातील २०२५ या वर्षातील क्षयरोगाबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे. वर्ष २०२५ मध्ये एकुण शोधण्यात आलेले क्षयरुग्ण २३३५, बरे झालेले क्षयरुग्ण ११२६, उपचारावर असणारे क्षयरुग्ण ११५४ या वर्षीचे आपले उदिद्ष्ट १०० टक्के पुर्ण करण्यासाठी आपल्या सर्वांचे प्रयत्न आवश्यक आहे. या प्रमुख उदेद्शानेच क्षयरोगाबाबतची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

**क्षयरोगाचे भारतातील प्रमाण :-** प्रत्येक दोन मिनिटाला एक रुग्ण क्षयरोगाने मरण पावतो. एक थुंकी दुषित रुग्ण वर्षभरात १० ते १५ लोकांना क्षयरोगाचा प्रसार करतो. यामुळे क्षयरुग्ण संख्येत वाढ होत आहे. यामुळे या क्षयरोगास गांर्भीयाणे घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण उद्याचा भारत देश क्षयरोग मुक्त असला पाहिजे. क्षयरोग म्हणजे कायघ् य. क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस नावांच्या जंतुमुळे होतो. या जंतुचा शोध डॉ.रॉबर्ट कॉक या शास्त्रज्ञाने २४ मार्च-१८८२ रोजी लावला हे जंतु मुख्यतः फुप्फूसांवर परिणाम करतात. त्यामुळे फुप्फूसाचा क्षयरोग होतो. परंतु काही रुग्णांमध्ये शरीराच्या इतर भागावरही उदा. हाडे, मज्जातंतु, सांधे, लिम्फनोड, इत्यादी या जंतुचा परिणाम होतो.

**क्षयरोग कसा पसरतो :-** मायकोबॅक्टेरियम टयुबरक्युलोसिस हे क्षयरोगाचे जंतु हवेतुन पसरतात (ड्रॉपलेट इन्फेक्शन). फुप्फुसाचा क्षयरोग असलेला रुग्ण जेंव्हा खोकतो किंवा शिंकतो तेंव्हा क्षयरोगाचे हे जंतु हवेत पसरतात व ज्यावेळी निरोगी मनुष्य श्वास घेतो तेंव्हा हे जंतु त्याच्या शरीरात श्वसनमार्गे प्रवेश करतात व ज्यावेळी त्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती कमी होते, त्यावेळी क्षयरोगाचे लक्षणे दिसुन येतात.

**अ) सर्वसाधारण व्यक्ती :-** २ आठवड्यापेक्षा जास्तीचा खोकला, संध्याकाळी ताप येणे, वजनात घट, भुक मंदावणे , छातीत दुखणे, खोकल्यातून किंवा थुंकीतून रक्त पडणे.

**ब) अति जोखमीच्या व्यक्ती :-** थुंकी दुषित रुग्णांच्या संपर्कातील व्यक्ती, मधुमेही, एच.आय. व्ही.बाधीत रुग्ण, कुपोषित व्यक्ती, प्रतिकार शक्ती कमी असलेले, धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती, स्टेरॉईड औषध घेणाऱ्या व्यक्ती, मुत्रपिंडाचे आजार असणाऱ्या व्यक्ती, फुप्फुसाचे इतर आजार असणाऱ्या व्यक्ती (दमा) यांना एक दिवसाचा जरी खोकला असला तरी ती क्षयरोगाची संशयीत व्यक्ती आहे म्हणुन त्यांनी क्षयरोगाची तपासणी करावी.

**फुफुसाव्यतिरिक्त क्षयरोग :-** मानेवर सुज व गाठी, मज्जातंतू, हाडे, सांधे, पाठीचे मणके इ. शरीराच्या अवयवांना क्षयरोग होतो, याला पुपुसाव्यतीरीक्त क्षयरोग म्हणतात. क्षयरोगाचे निदान :-फुप्फुसाच्याक्षयरोगाचे निदान हे थुंकी (बेडका) तपासणीव्दारे व छातीचा क्ष-किरण तपासणी करुन केले जाते.यामध्ये संशयीत क्षयरुग्णांची दोन बेडका नमुने तपासणीसाठी घेतले जातात. सुक्ष्मदर्शकाखाली दोन्ही थुंकी नमुन्यावर प्रक्रिया करुन तपासणी केली जाते.संबधीत रुग्णाची बेडका तपासणी व छातीचा क्ष-किरण तपासणी केल्यानंतरसदरील रुग्ण पॉझिटीव्ह असल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत डॉट्स औषधोपचार सुरु करण्यात येतात. तसेच सिबीनॅट तपासणीही करतात. वरील सर्व तपासण्या शासकीय रुग्णालयात मोफत केल्या जातात.

**औषधोपचार :-** राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत डॉटस् औषधोपचार प्रणालीचा वापर केला जातो. या औषधोपचार प्रणालीमध्ये क्षयरुग्णांना वजनाप्रमाणे औषधोपचार हे या औषधोपचार पध्दतीचे मुख्य वैशिष्टये आहे. वजन गट रुग्णांचे प्रकार अतिदक्षता काळात दिला जाणारा औषधोपचार पध्दत नियमित काळात दिला जाणारा औषधोपचार क्षयरुग्णांना शासनामार्फत मोफत देण्यात येतो. डॉटस् औषधोपचार पध्दतीमुळे जिल्हयातील जास्तीत जास्त क्षयरुग्ण बरे होत आहेत व ही क्षयरोगावरील प्रभावी औषधोपचार पध्दती ठरत आहे. डि.आर.टिबी :- जालना जिल्ह्यात दिनांक १४ फेब्रुवारी २०११ पासून डि.आर.टिबी औषधोपचार प्रणाली सुरु करण्यात आली आहे. क्षयरुग्णांनी डि.एस.टिबी औषधोपचार प्रणालीप्रमाणे व्यवस्थित औषधी न घेतल्यास, कोणताही फॉलोअप स्पुटम पॉझिटिव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, एचआयव्ही बाधीत अशा केसच्या संशयित क्षयरुग्णांना डि.आर.टिबी संशयीत क्षयरुग्ण म्हणतात. डॉट प्लस साइट येथे रुग्णाच्या विविध शारीरीक व रक्ताची तपासणी केली जाते. तसेच रुग्णांना पीएमडीटी अंतर्गत औषधे व्यवस्थितरीत्या रुग्णाच्या शरीरास लागू होतात किंवा नाही याची खात्री केल्या जाते. डॉट प्लस साईटने ठरवून दिलेल्या नुसारच औषधोपचार ६ ते २० महिने दिल्या जातो. तसेच नविन औषधी बिडाक्युलीन व डेलामॅनीड हे औषधी क्षयरोगावर अत्यंत प्रभावी ठरत असुन हे रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. तसेचशासन सदर औषधी क्षयरुग्णास मोफत पुरवठा करते. सिबीनॅट / ट्रनॅट **प्रयोगशाळा :-** ०१ मे २०१६ पासुन जालना जिल्ह्यात मोफत सिबीनॅट व ट्रनॅट तपासणीची सुविधा पुरविण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये जालना जिल्हयात सिबीनॅट व ट्रनॅटव्दारे तपासणी सुविधा खालील १८ ठिकाणी उपलब्ध आहेत. जालना जिल्हयातील सिबीनॅट मशिन साईट उपजिल्हा रुग्णालय अंबड, सामान्य रुग्णालय, जालना, जिल्हा क्षयरोग केंद्र, जालना, ग्रामिण रुग्णालय घनसावंगी, ग्रामिण रुग्णालय परतुर, तर जालना जिल्ह्यातील ट्रनॅट मशिन साईट ग्रामिण रुग्णालय बदनापुर, ग्रामिण रुग्णालय मंठा, ग्रामिण रुग्णालय जाफ्राबाद, सामान्य रुग्णालय जालना, ग्रामिण रुग्णालय राजुर, ग्रामिण रुग्णालय टेंभुर्णी, वैद्यकीय महाविद्यालय वरुडी ता.बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंबड, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय बदनापुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय भोकरदन, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय घनसावंगी, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय परतुर, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंठा या प्रयोगशाळेत सर्व नवीन क्षयरुग्ण कोणताही फॉलोअपस् स्पुटम पॉझिटीव्ह, डिफॉल्टर, फेल्युअर, रिलॅप्स केस, लहान बालके, ईपी केसेस, एचआयव्ही बाधीतक्षयरुग्णांची मोफत केली जाते. क्षयरुग्णांचे निदान तो कोणता क्षयरोग आहेघ् औषधास दाद देणारा किंवा औषधाला दाद न देणारा म्हणजेच डि.आर. टिबी आहे, हे पाहण्यासाठी रुग्णांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. या प्रयोगशाळेत सर्व शासन यंत्रणेत क्षयरोगाचा औषधोपचार घेणारे क्षयरुग्ण व खाजगी रुग्णालयात क्षयरोगाचा उपचार घेणारे क्षयरुग्ण यांची मोफत तपासणी केली जाते. सदर तपासणी खाजगी प्रयोगशाळेत केली असता त्यासाठी साधारण ३ ते ४ हजार रुपये खर्च येतो, ही सेवा शासनामार्फत सर्व क्षयरुग्णांना उपरोक्त ठिकाणी मोफत देण्यात येत आहे. निक्षय पोषण आहार योजना :-०१ एप्रिल-२०१८ पासुन भारत सरकारने क्षयरुग्णांसाठी निक्षय पोषण आहार योजनेची सुरवात केली आहे. या योजनेअंतर्गत शासकीय यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणारा क्षयरुग्ण किंवा खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेणारा क्षयरुग्ण संपुर्ण क्षयरोग उपचार पुर्ण होईपर्यंत प्रती महिना १०००/- रु.असे मानधन सकस पोषण आहार घेण्याकरीता क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये डीबीटीव्दारे जमा करण्यात येते. वर्ष २०२५ मध्ये जालना जिल्हयामध्ये शासकीय व खाजगी यंत्रणेकडे क्षयरोगाचा उपचार घेणाऱ्या २३६४ क्षयरुग्णांना ५३,८६,०००/- रु. इतके अनुदान जिल्हा क्षयरोग केंद जालना मार्फत क्षयरुग्णांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यात आले आहेत.

**टिबीमुक्त भारत अभियान :-**भारत सरकारने दिनांक ०९ सप्टेंबर-२०२२ पासुन 'टिबीमुक्त भारत अभियान' ची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना तसेच रुग्णांच्या गरजेनुसार मदत ही जिल्हयातील सिएसआर अंतर्गत येणाऱ्या औद्योगीक संस्था, सिड् स कंपन्या, दानशुर व्यक्ती इत्यादींना 'निक्क्षय मित्र' बनवुन 'कम्युनिटी सपोर्ट टु टिबी पेशंटस' या योजनेअंतर्गत क्षयरुग्णांना मदत पुरविली जात आहे.

माहे वर्ष-२०२२ ते आजपर्यंत उपचारावर असणाऱ्या क्षयरुग्णांना १९०४६ कोरड्या पोषण आहार किटचे वाटप जालना जिल्हयातील विविध एनजीओ, जालना स्टील मेन्युफैक्चरिंग असोसिएशन, सामाजिक संस्था, दानशुर व्यक्ती इत्यादींनी क्षयरुग्णांना मदत केलेली आहे.

**प्रतिबंधात्मक उपाय योजना :-** इंग्रजीमध्ये एक म्हण आहे कोणत्याही आजाराला बरे करण्यापेक्षा त्याला प्रतिबंध करणे केंव्हाही चांगले. त्यासाठी खालील उपाययोजना आहेत.

१.नवजात बालकांचे १०० टक्के बी.सी.जी.चे लसीकरण झाले पाहिजे. २.आपला आहार संतुलीत सकस प्रथीनेयुक्त असावा. ३.व्यसनांपासून दुर राहणे (धुम्रपान, दारु, तंबाखु) ४.थुंकी दुषित क्षयरुग्णांनी तोंडाला रुमाल किंवा एन-९५ मास्क बांधणे. ५. संशयीत क्षयरुग्णाला शोधुन लवकर रोग निदान व औषधोपचार करणे. ६.स र्व फुप्फुसाच्या क्षयरुग्णांच्या संपर्कातील व्यक्तींना वजनानुसार गोळ्या ०६ महिने घेणे आवश्यक आहे. ७.नातेवाईक, मित्र-मंडळी व घरातील इतर व्यक्तींनी सदर रुग्ण नियमित औषधोपचार घेतो की नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण एक थुंकीदुषित क्षयरुग्ण १० ते १५ लोकांना क्षयरोगाची बाधा करतो. ८.मधुमेह व इतर आजारांचे नियमित उपचार घेणे. २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन २०२६ चे घोषवाक्य खालीलप्रमाणे आहे.

होय ! आपण क्षयरोगाचा अंत करू शकतो : नेतृत्व जालना जिल्हा, समर्थीत जनभागीदारी

**- डॉ. जी. एम. कुडलीकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जालना**

## संक्षिप्त

### कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे बुधवारी (दि.२५) रोजगार मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ कौशल्य विकास,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने जागेवर निवड संधी देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्टँड रोड, मालजीपुरा छत्रपती संभाजीनगर येथे बुधवार दि.२५ रोजी सकाळी १० वा. रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. त्यात आय सी आय सी आय बँक, कोटक महिंद्रा बँक, ईक्युटास स्मॉल फायनांन्स बँक, नेक्सलॅड कंन्सल्टींग एल एल पी इत्यादी नियोक्त्यांनी कोणतीही पदवी/ डिप्लोमा- मेकॅनिकल/इलेक्ट्रीकल/इलेक्ट्रॉनिक, आय टी आय - ऑल ट्रेड, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराची २२८ रिक्तपदे उपलब्ध असून विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या ,.ीक्षसरी.ारहीूरा.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या ४ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# लोकप्रतिनिधींच्या फक्त 'व्हिजिट'ने रुग्ण बरे होणार का?

# लासूर स्टेशन आरोग्य केंद्राचा डोलारा रिक्त पदांच्या खांद्यावर!

**आत्ताच एक्सप्रेस**
**लासूर स्टेशन (प्रतिनिधी)**/ आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून कोट्यवधी रुपये खर्च करून लासूर स्टेशन येथे भव्य प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत उभी राहिली. दिसायला ही इमारत देखणी असली, तरी आतून मात्र या आरोग्य केंद्राला 'रिक्त पदांच्या' आणि 'अपुऱ्या सुविधांच्या' रोगाने ग्रासले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांनी रविवारी अचानक भेट देऊन कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतली खरी, पण केवळ 'भेटी' आणि 'शेरे' मारून रुग्णांना न्याय मिळणार का? असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक विचारत आहेत.

**इमारत चकाचक, पण स्टाफ गायब!**

मिळालेल्या माहितीनुसार, या आरोग्य केंद्रात लॅब टेक्निशियन, ३ परिचर आणि २ आरोग्यसेविका यांची पदे दीर्घकाळापासून रिक्त आहेत. रोगाचे निदान करणारा लॅब टेक्निशियनच नसेल, तर उपचार तरी कशाच्या जोरावर होणार? याशिवाय ८ उपकेंद्रांची अवस्थाही बिकट आहे; कुठे आरोग्य सेवक आहे तर सेविका नाही, तर कुठे दोन्ही पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत 'आरोग्य सेवा' फक्त नावापुरतीच उरली आहे.

**केवळ 'फैलावर' घेऊन प्रश्न सुटणार का?**

रविवारी एका साखरपुडा सोहळ्याला आलेले झेडपी अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांनी 'कामात काम' म्हणून केंद्राला भेट दिली. कार्यकर्त्यांच्या तक्रारीनंतर त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना फैलावर घेतले आणि शिस्तीचे डोस पाजले. मात्र, स्थानिक नागरिकांच्या मते, हा केवळ देखावा आहे. जोपर्यंत रिक्त पदे भरली जात नाहीत आणि अपूर्ण मशिनरी व फर्निचर उपलब्ध होत नाही, तोपर्यंत केवळ अधिकाऱ्यांना ओरडून काय साध्य होणार?

**आमदारांची जन्मभूमी, पण रुग्णांची हेळसांड!**

हे आरोग्य केंद्र आमदार प्रशांत बंब यांची जन्मभूमी असलेल्या गावात येते. आमदारांनी निधी आणून इमारत बांधली, लोकार्पणही झाले. मात्र, या इमारतीला साजेसा कर्मचारी वर्ग देण्यात शासन आणि प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. आधी पदे भरा, मगच व्हिजिट करा, अशा शब्दांत आता मतदारांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

**वैद्यकीय अधिकाऱ्यांची हतबलता की प्रशासकीय धाक?**

अध्यक्ष महोदयांनी व्हिजिट बुकवर दिलेल्या सूचनांचे पालन केले जाईल आणि कामात हयगय करणाऱ्यांवर कारवाई होईल, अशी प्रतिक्रिया वैद्यकीय अधिकारी डॉ. योगिता निर्मळ यांनी दिली. मात्र, रिक्त पदांमुळे येणारा कामाचा ताण आणि अपुऱ्या साहित्याबद्दल प्रशासन कधी हालचाल करणार, यावर अद्यापही प्रश्नचिन्ह कायम आहे.

थोडक्यात सांगायचे तर: लोकप्रतिनिधींनी व्हिजिट बुकवर शेरे मारण्यापेक्षा रिक्त पदे भरण्यासाठी पुढाकार घेतला, तरच लासूर स्टेशनच्या नागरिकांना खऱ्या अर्थाने आरोग्य सुविधा मिळतील.




## जिल्हास्तरीय ग्रंथोत्सव आज (दि.२४)पासून; ग्रंथप्रदर्शन, विविध परिसंवाद, काव्यवाचन, गजलयात्राचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचलनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, यांच्या वतीने मंगळवार दि.२४ व बुधवार दि.२५ असे दोन दिवस जिल्हास्तरीय छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. हे दोन दिवस वाचकांना व ग्रंथप्रेमींना ग्रंथप्रदर्शन, ग्रंथ खरेदीची संधी लाभणार असून विविध परिसंवादांतून वैचारीक मेजवानीही मिळणार आहे. या ग्रंथोत्सवात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी अधिकारी सुभाष साबळे यांनी दिलेल्या माहितीनुसार दोन दिवसीय ग्रंथोत्सवातील कार्यक्रमांची माहिती याप्रमाणे-

मंगळवार दि.२४ रोजी सकाळी ९ वा. ग्रंथ दिंडी क्रांती चौकातून निघेल.महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते या दिंडीचा शुभारंभ होईल. वरिष्ठ कोषागार अधिकारी वैजनाथ शेळके, मानव विकास आयुक्तालयाचे सहाय्यक आयुक्त सुनिल सुर्यवंशी, प्रकाशक संघटनेचे कुंडलिक अतकरे, शिक्षण विस्तार अधिकारी जालम चौरे यांची प्रमुख उपस्थिती राहील.

सकाळी साडेदहा वा. समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होईल. सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री संजय शिरसाट, इतर मागास वर्ग बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खा. डॉ. भागवत कराड, लोकसभा सदस्य खा. संदिपान भुमरे, खा. डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आ.विक्रम काळे, आ.सतिष चव्हाण, आ. संजय केणेकर, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ. अब्दुल सत्तार, आ. प्रशांत बंब, आ. प्रदीप जयस्वाल, आ. श्रीमती अनुराधा चव्हाण, आ. श्रीमती संजना जाधव, आ. विलास भुमरे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, ज्येष्ठ साहित्यीक डॉ. दादा गोरे, ग्रंथ निवड समिती सदस्य गुलाबराव मगर आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी माजी विभागीय आयुक्त पुरुषोत्तम भापकर हे राहणार आहेत.

दुपारी २ वा. कृत्रिम बुद्धीमत्ता आणि ग्रंथालये या विषयावर परिसंवाद होईल. अध्यक्षस्थानी डॉ. रा. शं.बालेकर हे राहणार असून जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. अनिल लहाने हे वक्ते आपले विचार मांडतील. सायं.४ वा. काव्यवाचन होईल. अध्यक्षस्थानी प्रा.ललित अधाने हे राहतील. तर विष्णू सुरासे, हबीब भंडारे, देवानंद पवार, श्रीमती माधुरी चौधरी,सिंधुताई क्षीरसागर, कावेरी खरात, भक्ती शिहे, धम्मपाल जाधव हे कवी सहभागी होतील. सुत्रसंचालन निलेश चव्हाण हे करतील.

बुधवार दि.२५ रोजी सकाळी ११ वा. 'अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य: सांस्कृतिक वारसा आणि समाजधारणा' या विषयावर परिसंवाद होईल. अध्यक्षस्थानी ड वैशाली डोळस राहतील. प्रा. डॉ. संजय गायकवाड, ड. वैशाली कडू, प्रा. महेश खरात हे वक्ते आपले विचार मांडतील. दुपारी २ वा. कथाकथकन कार्यक्रमात नामदेव निकम, संतोष तांबे, निवृत्ती काळे हे सहभागी होतील तर गेनू शिंदे हे अध्यक्षस्थानी राहतील.

दुपारी साडेतीन वा. गजल यात्रा या कार्यक्रमात रमेश ठोंबरे, गिरीश जोशी, ऋषभ कुलकर्णी, अर्जून गायकवाड, अमेय तांदुळजे हे सहभागी होतील. सायं.साडेचार वा. समारोप व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यीक डॉ. ऋषिकेश कांबळे हे राहतील. जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, सहा. ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील. सम्राटसिंग राजपुत, साहित्यिक डी.एस. काटे, ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र वाणी आदी मान्यवर उपस्थित राहतील.

या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात सहभागाचे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष सुनील हुसे, सदस्य जिल्हा शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने, मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. दादा गोरे, प्रकाशक संघटनेचे कुंडलिक अतकरे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुभाष सोळंके, जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा सदस्य सचिव सुभाष साबळे यांनी केले आहे.

## इतर राज्यातून येणाऱ्या पशुधनाचे टॅगिंग आवश्यक- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यामध्ये असणाऱ्या पशुधनांचे योग्य वेळी लसीकरण आणि त्यांचे खरेदी-विक्री पारदर्शक व्हावी यासाठी त्यांचे टॅगिंग होणे आवश्यक आहे, शासकीय नियमानुसार शेतकरी किंवा पशुपालन व्यवसाय करणाऱ्यांच्या नावाशी पशुधनाचे टॅगिंग नोंदीत असणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. सीमेलगत असणाऱ्या विविध राज्यातून येणारे पशुधन याचे टॅगिंग नसल्यामुळे खरेदी विक्रीचा व्यवहार हा पारदर्शक पद्धतीने होत नसल्याचे दिसून येते आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्ह्यात येणाऱ्या पशुधनाचे टॅगिंग आणि नोंदणी असणे आवश्यक असल्याचे सांगितले. यासाठी पशु पशुसंवर्धन विभाग, पोलीस प्रशासन आणि परिवहन विभाग यांनी याबाबत वाहतूक होत असताना तसेच खरेदी-विक्री होत असताना टॅगिंग असणाऱ्या पशुधनाची तपासणी करण्यात यावी. संबंधित व्यापाऱ्यांना पशुधन बाजाराच्या ठिकाणी जनावरांच्या जसे गाय,



बैल, शेळी, म्हैस, यांच्या कानावर असलेल्या बिल्ला किंवा शिक्का आहे किंवा नाही याची माहिती देणारे पत्र किंवा लेखी नोंदी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर उष्माघातापासून बचाव करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पशुधनाची योग्य काळजी घेण्यासाठी लसीकरण, चारा उपलब्धता आणि पाण्याची व्यवस्था याबाबत नियोजन करावे.उष्माघात पासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक सूचना शेतकऱ्यांना देण्यात याव्यात . २९ मार्चपूर्वी जिल्ह्याच्या पशुधन लसीकरणाचे दिलेले उद्दिष्ट विभागाने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले .

जिल्ह्यामधील पशुधनाच्या लाळ खुरकूत प्रतिबंधक लसीकरण मोहिमेअंतर्गत ५७% लसीकरण पूर्ण झाल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नानासाहेब कदम यांनी सांगितले.

## शालेय मुलींना सैनिक प्रशिक्षण:माजी सैनिकांना संपर्क साधण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत इयत्ता ६ वी ते १२ वी इयत्तेतील मुलींना स्वसंरक्षण प्रशिक्षण, जीवन कौशल्य, योगा, सैनिकी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यातील २१ हजार २७९ स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय शाळांमध्ये अनुभवी माजी सैनिकांची आवश्यकता आहे. तरी इच्छुक माजी सैनिकांनी प्रोजेक्ट मॅनेजर प्रफुल हिवाळे यांच्याशी ८६५७४६८७९५ वर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## उन्हाळ्यात उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी दक्षता घ्यावी; जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून मार्गदर्शक सुचना जारी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ येत्या कालावधीत उन्हाळ्यात तापमान वाढ होऊन त्याचा परिणाम आरोग्यावर होत असतो. अशा या उष्मा लाटेपासून बचावासाठी नागरिकांनी घ्यावयाच्या दक्षतांबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आल्या आहेत.

**काय करावे?**

१. पुरेसे पाणी प्या.तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पाणी प्या.
२. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा.
३. दुपारी १२ ते ३ वाजे दरम्यान शक्यतो घराबाहेर जाणे टाळा.
४. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा.
५. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करा.
६. हलके, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.
७. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे.
८. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकावा.
९. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास जठड, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे,लिंबू पाणी, ताक इत्यादीचा वापर करावा.
१०. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची लक्षणे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.
११. गुरांना छावणीत ठेवावे, पिण्यास त्यांना पुरेसे पाणी द्यावे.
१२. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्या.
१३. पंखे, ओले कपडे याचा वापर करावा.तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.
१४. कामाच्या ठिकाणी पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था करावी.
१५. सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळण्यासाठी कामगारांना सूचित करावे.
१६. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. तसेच बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये-मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करावा.
१७.गरोदर स्त्रिया आणि आजारी व्यक्तिंची अधिक काळजी घ्यावी.
१८. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या डऊच-चरहरीरीहींर या ट्विटर, फेसबुक व कु-ॲप वरील सुचना पहाव्यात. १९. जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणाऱ्या सूचना पहाव्या.

**काय करु नये?**

१. उन्हात अतिकष्टाची कामे करू नका.
२. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड- थंड पेये घेऊ नका.
३. दुपारी १२ ते ३ या वेळे दरम्यान घराबाहेर जाणे टाळा.
४. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका.
५. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये.
६. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. ७. बाहेर तापमान जास्त असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी.
८. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे, तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावीत.

उष्मा लाटेपासून स्वतःचा व आपल्या आप्तेष्टांच्या बचावासाठीवरीलप्रमाणे उपाययोजना अवलंबाव्या,असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जनार्दन विधाते यांनी केले आहे.

## अखेर आ.सौ.जाधवांच्या सातत्याने कृषी कार्यालयास रस्ता मिळाला

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी**/ कन्नड तालुक्यातील बळीराजाच्या अत्यंत अडीअडचणी बाबत महत्वाचे असलेले तालूका कृषी अधिकारी कार्यालयात जाणेसाठी रस्ताच नसलेमुळे गेल्या अनेक दिवसापासून शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली होती. ही अडचण लक्षात घेऊन तालुक्याच्या आ.सौ.संजनाताई जाधव यांनी पालकमंत्री ना.संजय शिरसाठ यांचेकडे सततचा पाठपुरावा करून या रस्त्यासाठी २ कोटी २० लाखाचा निधी मंजूर करून घेतला व दि.२१ रोजी प्रत्यक्ष सदर रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनही स्व : हस्ते पार पडले,.या होणाऱ्या पक्क्या रस्त्यामुळे तालुकाभरतील शेतकरी वर्गाचे कायमस्वरूपीचे हाल दूर होणार असुन शेतकरी व कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या भूमिपूजन वेळी उपविभागीय कृषिधिकारी सुभाष आघाव,तालूका कृषिधिकारी संदीप शिरसाठ, उपकृषीधिकारी दीनानाथ पाटील,मंडळ अधिकारी महेंद्र डोंगरदिवे,भीमराव कांबळे,कृषी उत्पन्न बाजार समितेचे सभापती डॉ.मनोज राठोड,उपसभापती जयेश बोरसे,खरेदी विक्री संघाचे सभापती ज्ञानेश्वर निकम, संचालक आकाश बोलधने, रुग्ण कल्याण समितीचे सर्वेसर्वा राम पवार, अशोक वाहूळ, सुधाकर पवार, आदित्य गर्जे,

आर डी शिंदे,मनोज पोतदार,बबन पवार, दीपक बिरारे आदी अधिकारी,नेतेगन, पक्षाच्या महिला पदाधिकारी सह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## पैठण तालुक्यात भीषण अपघात; तरुणाचा मृत्यू, दोघे जखमी...

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी** / पैठण तालुक्यातील चनकवाडी फाटा येथे रविवारी (दि. २२ मार्च २०२६) सायंकाळी साडेसातच्या सुमारास झालेल्या भीषण दुचाकी अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, युनिकॉर्न होंडा कंपनीची मोटारसायकल (क्र. चक-२० क--३९६३) भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित असताना समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीला (क्र. चक-१६ उङ-३६८६) जोरदार धडक दिली. या अपघातात जितेंद्र हरीश्चंद्र काळे (वय ३२, रा. खडका मडका, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या अपघातात फिर्यादी हरीचंद्र झुंबर काळे (वय ७६) यांच्या पत्नी व लहान मुलगा युग यांना किरकोळ दुखापत झाली असून मुलगा निखिल हा गंभीर जखमी झाला आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९३/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातातील मोटारसायकल चालकाचे नाव व गाव अद्याप अज्ञात असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

सदर अपघात पोलीस ठाण्यापासून सुमारे ४ किमी अंतरावर दक्षिण दिशेला घडला. या घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक तळेकर करीत आहेत.

> निष्काळजी वाहनचालकांमुळे होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत असून वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे.
> **महादेव गोमारे (पोलीस निरीक्षक)**
> **पोलीस ठाणे पैठण**

## संक्षिप्त

### जालन्यात शुक्रवारी 'ग्राहक पंचायत'ची महत्त्वाची जिल्हा बैठक; आगामी नियोजनावर होणार चर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**


**जालना प्रतिनिधी**/ग्राहक पंचायत महाराष्ट्र, जिल्हा जालना पदाधिकारी आणि सदस्य मंडळाची महत्त्वपूर्ण जिल्हा बैठक येत्या शुक्रवारी, २७ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. दुपारी २ वाजता रेल्वे स्टेशन रोडवरील हॉटेल सनराईज येथे ही बैठक पार पडणार आहे. ग्राहक पंचायत महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष मोहन इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न होणार असून, डॉ. दिलीप लाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे. या बैठकीत प्रामुख्याने ग्राहक पंचायतीच्या आगामी काळातील कार्याचे नियोजन करणे आणि विविध तालुका समित्यांचे गठन करणे या विषयांवर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी या बैठकीला नियोजित वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा संघटक संजय देशपांडे आणि सचिव शिवाजी वाघ यांनी केले आहे. ग्राहकांच्या हितासाठी आणि संघटनेच्या मजबुतीसाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॅलीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जागतिक क्षयरोग दिन २४ मार्च रोजी दरवर्षी साजरा करण्यात येतो. या दिनाच्या अनुषंगाने क्षय रोगाची जनजागृती व्हावी या उद्देशाने रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रॅली सकाळी ८ वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय येथून मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पुढे मार्गस्थ होईल. यानंतर रॅली सतकर कॉम्प्लेक्स मार्गे अंबड चौफुली येथून जिल्हा परिषद जालना येथे समाप्त होईल. रॅलीमध्ये नर्सिंग कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी होतील. असे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जी एम कुडलीकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मुस्लिम ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज हरपला; शब्बीर अहमद अन्सारी यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष आणि वंचित-बहुजन समाजाच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे निस्वार्थ नेतृत्व शब्बीर अहमद अन्सारी यांचे रविवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ मुस्लिम समाजच नव्हे, तर संपूर्ण ओबीसी चळवळीची मोठी हानी झाली असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**समतेच्या विचारांशी कधीही तडजोड नाही: ड. नाजेर काजी**

शब्बीर अन्सारी यांच्या निधनावर महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष ड. नाजेर काजी यांनी खोल दुःख व्यक्त केले. श्रद्धांजली अर्पण करताना ते म्हणाले की, शब्बीर अहमद अन्सारी यांनी आपले संपूर्ण जीवन वंचित समाजाला, विशेषतः मुस्लिम ओबीसींना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी समर्पित केले. त्यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या विचारांशी कधीही तडजोड केली नाही. असा निस्वार्थ नेता समाज कधीही विसरणार नाही.

**अंत्यविधीला जनसागर लोटला**

शब्बीर अहमद अन्सारी यांच्या पार्थिवावर रविवारी रात्री १० वाजता राजाबाग शेर सवार मुस्लिम कब्रस्तानमध्ये दफनविधी पार पडला. यावेळी त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी राज्यभरातून विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि चाहत्यांचा मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

**मान्यवरांची उपस्थिती**

त्यांच्या अंत्यसंस्काराप्रसंगी माजी आमदार कपिल पाटील, अरविंदराव चव्हाण, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव आंबेकर, समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत, औरंगाबादचे माजी महापौर रशीद मामू, फारूख मुस्तफा, एकबाल पाशा, कल्याण दळे, राजेंद्र राख, अब्दुल हाफिज, भाऊसाहेब घुगे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याव्यतिरिक्त, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील खालील मान्यवरांनीही उपस्थित राहून अन्सारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली:

शेख महमूद, झकी कुरेशी, शहा आलम खान, युसूफ निजामी. प्रा. सत्संग मुंढे, डॉ. प्रकाश इंगळे, संजय इंगळे, शेख माजेद.

सगीर अहमद, नवाब डांगे, आसेफ अन्सारी, डॉ. विशाल धानुरे. कलीम खान, अहमद नुर, इफ्तेखारुद्दीन, मोहन इंगळे, शेख शकील. ड. अंबादास खर्डेकर, परमेश्वर गरबडे, संदीप खरात, विठ्ठल म्हस्के. इकबाल कुरेशी, बासेद कुरेशी, खलील कुरेशी, फिरोज बागवान, अलीम कुरेशी, बाबासाहेब सोनवणे, शेख इब्राहिम आणि जावेद अली.

**थोडक्यात:**

शब्बीर अहमद अन्सारी यांनी मुस्लिम समाजातील मागासवर्गीयांना ओबीसी आरक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## भोकरदन:वादळी वाऱ्याने सोलरचे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन प्रतिनिधी** / वातावरणात बदल होऊन विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह तालुक्यात मागील विहिरी जवळ हजारो रुपये खर्च करून बसविण्यात आलेले

सोलरचे पण मोठे नुकसान झाले आहेत यात सोलारच्या पाट्या तुटल्याचे अनेक ग्रामीण शिवारात असलेल्या विहिरीवरील सोलार पंपच्या पाट्या तुटल्याने या शेतकऱ्याचे देखील मोठे नुकसान झाले आहे.

याबाबत महसुल विभागाने




गेल्या काही दिवसांपूर्वी जोरदार पाऊसाने हजेरी लावली व

वाऱ्यामुळे व हलक्या गारपीट आणि पावसामुळे शेत पिकांचे नुकसान झालेच मात्र शेतीमध्ये भागातील शेतकऱ्याकडून सांगण्यात आले.

तालुक्यातील कोळेगाव येथील शेतकरी गजानन रामचंद्र गावंडे यांची कोळेगाव तत्काळ पंचनामा करून लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळुन देण्याची मागणी शेतकरी गजानन रामचंद्र गावंडे यांनी केली आहे हे विशेष.

## शिवछत्रपती महाविद्यालयात 'पेटंट फायलिंग' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/ गणेश सपकाळ**/ स्थानिक शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पीएम-उषा (झच-णडक-) सॉफ्ट कंपोनंट अंतर्गत 'स्वामित्व हक्क (झरींशपीं ऋळश्रळपस ळप खपवळर)' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी आणि प्राध्यापकांना बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व आणि त्यातील तांत्रिक बाबींचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रमुख मार्गदर्शकांचे प्रतिपादन**

या कार्यशाळेसाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून सोलापूर येथील ग्लोबल व्हिलेज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एम. बेटकर उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात डॉ. बेटकर यांनी 'पेटंट' या संकल्पनेची व्याप्ती स्पष्ट केली. ते म्हणाले की, आजच्या युगात नाविन्यपूर्ण कल्पनांना कायदेशीर संरक्षण असणे आवश्यक आहे. त्यांनी केवळ पेटंटच नव्हे, तर कॉपीराइट, ट्रेडमार्क, लोगो डिझाइन आणि नवनवीन शोध यांसारख्या बौद्धिक संपदेच्या विविध घटकांवर प्रकाश टाकला. संशोधनाला व्यावसायिक आणि कायदेशीर अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी पेटंट नोंदणीची प्रक्रिया कशी पूर्ण करावी, याचे सविस्तर सादरीकरण त्यांनी केले.

**अध्यक्षीय विचार**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते. अध्यक्षीय समारोप करताना त्यांनी स्पष्ट केले की, पेटंट हे केवळ वैयक्तिक फायद्यासाठी नसून त्यातून समाजाला उपयुक्त अशा गोष्टींची निर्मिती होते. संशोधनामुळे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीला हातभार लागतो, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता संशोधन वृत्ती जोपासण्याचे आणि नवनवीन संकल्पना विकसित करण्याचे आवाहन केले.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी कार्यशाळा आयोजनामागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास महाजन यांनी केले. याप्रसंगी



व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, पीएम-उषा समन्वयक प्रा. संदीप सातोणकर, डॉ. सुभाष पोटभरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यशाळेला डॉ. हेमंत कुमार जैन, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. गांधी बानायत, प्रा. विनोद कांबळे, प्रा. सचिन कदम, प्रा. नितीन चित्ते, गजानन इंगळे, मुरलीधर जिने यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाविषयी नवी उमेद निर्माण झाली असून, बौद्धिक संपदा हक्कांबाबतची जागरूकता वाढण्यास मदत झाली आहे.

## बाचेगावच्या चिमुकल्यांची राज्यस्तरावर गरुडझेप; 'मी ज्ञानी होणार' परीक्षेत कल्याणी वाजे राज्यात दुसरी, तर समर्थ मुळे तिसरा!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी/ गणेश सपकाळ**/ शिक्षणाची जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थी आता राज्याच्या नकाशावर आपली चमक दाखवू लागले आहेत. याचाच प्रत्यय जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात आला आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बाचेगाव येथील विद्यार्थ्यांनी 'मी ज्ञानी होणार' या राज्यस्तरीय चाचणी परीक्षेत अभूतपूर्व यश संपादन करून गावाचा आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे.

**यशाचे मानकरी: कल्याणी आणि समर्थची बाजी**

राजर्षी शाहू महाराज सामाजिक संस्था, खोंदला यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रतिष्ठेच्या परीक्षेत बाचेगाव शाळेतील एकूण १५ विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवली. यामध्ये:

कु. कल्याणी परमेश्वर वाजे: हिने १०० पैकी ९८ गुण मिळवत संपूर्ण राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

चि. समर्थ विष्णू मुळे: याने ९६ गुण मिळवत राज्यात तृतीय क्रमांक मिळवला.

**विशेष म्हणजे, हे दोन्ही विद्यार्थी राज्यस्तरीय शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

**इतर यशस्वी विद्यार्थ्यांची कामगिरी**

**केवळ अव्वल दोनच नव्हे, तर शाळेतील इतर विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश मिळवले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे:**

वैष्णवी जनार्धन मिंधर (९२ गुण)
भक्ती अरुण मुळे (९० गुण)
समर्थ नामदेव मुळे (९० गुण)
रुद्र सुनील थोरात (९० गुण)
अविनाश गणेश मुळे (९० गुण)
माधुरी गणेश मुळे (८८ गुण)
सोहम लक्ष्मण तारगे (८६ गुण)



स्वराज धनश्याम मुळे (८४ गुण)
श्रद्धा बालाजी मुळे (८२ गुण)
संदेश धर्मराज मिंधर (७२ गुण)
आरोही विजयकुमार रोडगे (७२ गुण)
श्रद्धा परमेश्वर राऊत (५० गुण)

कौतुकाचा वर्षाव

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची स्वतःची मेहनत, शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे खंबीर सहकार्य असल्याचे बोलले जात आहे. जिल्हा परिषद शाळांनी दाखवून दिले आहे की, सुविधा मर्यादित असल्या तरी गुणवत्तेत त्या कोठेही मागे नाहीत.

या यशाबद्दल बाचेगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## जि.प. शाळा खडकेश्वर येथे 'जागतिक चिमणी दिन' उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांनी बनवली घरटी अन् जलपात्रे!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना जिल्हा प्रतिनिधी/ गणेश सपकाळ**/ वाढते शहरीकरण आणि पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या चिमण्यांच्या संवर्धनासाठी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खडकेश्वर येथे २० मार्च २०२६ रोजी 'जागतिक चिमणी दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी चिमण्यांसाठी घरटी आणि जलपात्रे तयार करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. संकटात असलेले चिमण्यांचे अस्तित्व कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षकांनी उपस्थित विद्यार्थ्यांना चिमण्यांच्या घटत्या संख्येबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. आजच्या काळात होत असलेली अमर्याद वृक्षतोड, मोबाईल टॉवरचे रेडिएशन, तसेच वाढते ध्वनी आणि वायू प्रदूषण यामुळे चिमण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. जर चिमण्या निसर्गातून नाहीशा झाल्या, तर मानवी साखळीवर आणि परिसंस्थेवर त्याचे किती गंभीर परिणाम होतील. याची जाणीव यावेळी करून देण्यात आली. विद्यार्थ्यांचा कल्पक पुढाकार केवळ भाषणे न करता प्रत्यक्ष कृतीवर भर देत, विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून चिमण्यांसाठी आकर्षक घरटी आणि जलपात्रे (पाण्याचे भांडे) तयार केली.



उन्हाळ्याची चाहूल लागत असताना पक्षांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबावी, या उद्देशाने हे जलपात्र तयार करण्यात आले.

शपथ संवर्धनाची: चिमणी वाचवा, निसर्ग वाचवा हा मंत्र जपत विद्यार्थ्यांनी चिमणी संवर्धनासाठी काम करण्याची सामूहिक शपथ यावेळी घेतली. 'चिवचिव मंडळा'ची स्थापना या दिनाचे औचित्य साधून शाळेचे मुख्याध्यापक श्री. भरत मस्के आणि शिक्षिका श्रीमती ज्योती थोटे-गुळवणे यांनी विद्यार्थ्यांचे एक खास 'चिवचिव मंडळ' स्थापन केले. या मंडळाच्या माध्यमातून वर्षभर पक्षी संवर्धन आणि पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जाणार आहेत. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, चिमण्यांच्या किलबिलाटासाठी खडकेश्वर शाळेने उचललेले हे पाऊल इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## जालन्यातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी; २७ मार्च रोजी भव्य 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्या'चे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींसाठी एक आनंदाची बातमी आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्या'**च्या माध्यमातून जिल्ह्यातील बेरोजगारांना नामवंत कंपन्यांमध्ये रोजगाराची थेट संधी उपलब्ध होणार आहे.

**मेळाव्याचा तपशील खालीलप्रमाणे:**

दिनांक: २७ मार्च २०२६ (शुक्रवार)

वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत स्थळ: शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), जालना.

**प्रमुख वैशिष्ट्ये आणि आवाहन**

या मेळाव्यामध्ये विविध नामांकित कंपन्या, उद्योग आणि कॉर्पोरेट संस्था सहभागी होणार असून, पात्र उमेदवारांच्या जागेवरच मुलाखती घेतल्या जाणार आहेत. प्रसिध्दीपत्रकातील आवाहन: जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक महिला व पुरुष उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार विविध पदांसाठी अर्ज करण्याची आणि प्रत्यक्ष कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्याची ही उत्तम संधी आहे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता केंद्रातर्फे करण्यात आले आहे. **उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना:** १. उमेदवारांनी आपल्यासोबत शैक्षणिक कागदपत्रांच्या मूळ प्रती आणि साक्षांकित प्रतींचे (नशी) संच सोबत ठेवावेत. २. अर्जासाठी अद्ययावत बायोडाटा (Resume) सोबत आणणे आवश्यक आहे. ३. शक्य असल्यास कौशल्य विकास विभागाच्या अधिकृत पोर्टलवर आपली नोंदणी आधीच तपासून घ्यावी. जिल्ह्यातील कौशल्य विकास आणि युवकांना स्वावलंबी बनवण्याच्या दृष्टीने हा मेळावा मैलाचा दगड ठरणार आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813